Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0009

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

# थोर समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर

**डॉ. विलास आत्माराम देऊलकर**
सहयोगी प्राध्यापक
बॅ.बाळासाहेब खर्डेकर महाविदयालय वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग
ई.मेल - vadewoolkar@gmail.com

**सारांश -**

गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म कराड जवळील टेंभू या गावी एका ब्राम्हण कुटूंबात झाला. अत्यंत गरीबीमध्ये त्यांचे शिक्षण झाले त्यांचे प्राथमिक शिक्षण कराडला झाले. त्यानंतर ते अकोला येथे मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे पूणे डेक्कन कॉलेजमधून ते बी.ए.ची परीक्षा पास झाले. इ.स. १८८१ मध्ये त्याने एम.ए. ची पदवी प्राप्त केली. लोकमान्य टिकळ व त्यांनी एकत्रित शिक्षण घेतले व शिक्षण क्षेत्रात त्यांनी एकत्र काम केले. परंतू पुढे दोघातही वैचारीक मतभेत वाढत जावून शेवटी आगरकरांनी 'एकला चलो रे' हा मार्ग स्विकारला. विधवा विवाह, बालविवाह, विधवांचे केशओपन यासारख्या अनेक विघातक रूढीवर त्यांनी कडाडून टिका केली. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी शिक्षणाला फार महत्त्व दिले. त्यांच्या मते मानसिक व शारिरिक क्षीणता, दारिद्रय, पारतंत्र, अंधश्रध्दा, जातीभेद व अनिष्ट चालीरितींनी भारत देशात शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यांनी अस्पृष्यता निवडण्यासाठी प्रयत्न केले. जातीभेद वर्णभेद अस्पृष्यता यामुळे देशाचे फार मोठे नुकसान झाल्याचे व समाजाचा विकास खुंटल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

**किवर्ड** - आगरकर - सुधारक

**प्रस्तावना -**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या समाजसुधारकांनी महाराष्ट्रात प्राबोधनाचे कार्य केले आणि तत्कालीन पिढया ज्यांनी आपल्या विचारांची भारून टाकल्या. त्या समाजसुधारकांमध्ये आपल्याला गोपाळ गणेश आगरकर यांचे नावे प्रामुख्याने घ्यावे लागते. हया काळा ब्रिटीशांच्या गुलामगिरीचा शेवट करण्याचे कार्य अगोदर हाती घ्यावयाचे किंवा समाजसुधारणेचे महत्वाचे कार्य प्रथमत: हाती घ्यावयाचे असा मोठाच विवाद निर्माण झालेला होता. स्वातंत्र्याची चळवळ प्रथमत: हाती घेऊन गुलामगिरीचा शेवट केला पाहीजे. असे लोकमान्य बाळ गंगाधर टिकळ यांना वाटत होते तर सामाजिक सुधारणा केल्याशिवाय आपण स्वातंत्रयाला लायक होणार नाही. असे गोपाळ गणेश आगरकरांना वाटत होते. टिळक आणि आगरकर हे एकमेकांच्या समकालीन होते. टिळकांनी केसरी चालविला. तर गोपाळ गणेश आगरकरांनी 'सुधारक' नावाचे वृत्तपत्र चालविले. दोन्ही वृत्तपत्रातून आपापल्या भूमिका टिळक आणि आगरकर मोठया हिरीरीने मांडत असत. दोघेही ध्येयवादी आणि प्रामाणिक होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव तत्कालीन सुशिक्षतवर्गावर पडला. किंबहुना १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील सुशिक्षित पिढया टिळक आगरकरांनी घडविल्या तसेच म्हटले पाहीजे.

**समाजसुधारणा -**

गो.ग.आगरकर यांनी समाजप्रबोधन करण्यासाठी, सुधारक, केशरी व मराठा या वृत्तपत्रांचा आधार घेतला. इ.स. १८८७ पर्यंत त्यांनी केसरीचे संपादन केले. कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणात आगरकर व लोकमान्य टिळक यांना १०१ दिवसांची कारावसांची शिक्षा झाली होती. पुढे या दोघांत सामाजिक सुधारणाआधी की राजकीय सुधारणा आधी? याबाबतीत मतभेत निर्माण होऊन आगरकर यांनी केसरी वृत्तपत्राचे संपादन सोडून दिले व इ.स. १८८८ मध्ये त्याने सुधारक वृत्तपत्र सुरू केले. त्या वृत्तपत्रातून त्याने सामाजिक सुधारणेचे काम चालू ठेवले. बुध्दीप्रामाण्य, व्यक्तीस्वातंत्र्य, सामाजिक समता, स्त्रि-पुरूष समानता, ऐहिक जीवन पध्दती व विज्ञाननिष्ठा ही त्यांची जीवनमुल्ये होती. ध्येर्य, स्वार्थत्याग, मनोनिग्रह, व तत्वनिष्ट हे गुण त्यांच्या अंगी होते. या सदगुणांचा उपयोग यांनी लोकहितासाठी केला.

आगरकर यांनी हिंदूसमाजातील जातीभेदाला विरोध करून जातीसंस्था व जातीभेदामुळे आपले व देशाचे नुकसान झाल्याचे स्पष्ट केले. जातीभेदामुळे विदया, कलाशास्त्राची वाढ खुंटली. भूतदया, बंदुप्रेम, उदारता, धर्मबुध्दी या विचारांचे क्षेत्र मर्यादित झाले. धर्मविचार व आचारात मतभेद झाले. देभाभिमान संकुचित झाला. एवढे वाईट परिणाम जातीभेदामुळे झाले. जातीभेद ईश्वर निर्मित नाही हे सांगून जातीभेद नष्ट केले पाहीजेत असे विचार आगरकरांनी मांडले.

ज्या व्यक्तिचा स्पर्श टाळला जातो त्या व्यक्तिस अस्पृश्य समजले जात होते. अस्पुश्यतेच्या नावावर अस्पृश्यांना वाईट वागणूक दिली जात होती. सार्वजनिक पाणवठे, मंदिरे, येथे प्रवेश करण्यास बंदी होती. गो.ग.आगरकर यांनी अस्पृश्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. अस्पृश्यांना सार्वजनिक शाळेत प्रवेश दिला पाहीजे तेथे स्पृश्य व अस्पृश्यांची पंगत एकत्र असली पाहीजे. अस्पृश्याबद्दल बंदूभाव असेल तरच समाज बलवान व कर्तृत्वशाली बनेल असे त्यांनी मत मांडले. ३० जानेवारी १८९३ च्या सुधारक अंकास आगरकरांनी 'म्युनिसिपल हौद व ब्राम्हणावर गदा' हा लेख लिहून अस्पृश्यता व सोहळया ओवळयांच्या कल्पनेवर टीका केली. सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्याचा स्नान करण्याचा सर्वांना समान अधिकार असल्याचे प्रतिपादन आगरकरांनी करून त्यांनी प्रत्येक मनुष्य जन्मत: स्वतंत्र्य असल्याची भुमिका घेतली. त्यांनी असे मत मांडले की, स्पृश्य व अस्पृश्य यांच्या शरीररचनेत काहीही फरक नसताना त्यांच्यात भेदभाव का करणेत येतो. असे पक्षपाती शास्त्र झुगारून दिले पाहीजेत.

**<u>स्त्री सुधारणा -</u>**

आगरकरांनी स्त्री दास्य विमोचनाचा प्रश्न आग्रहांनी मांडला. स्त्री शिक्षण, बालविवाह, विधवाविवाह, विधवा पुर्नर्विवाहाचा प्रश्न, विधवांची वाईट स्थिती, केसओपन, व सती, स्त्रियांचे अर्थांजन याबाबतीत त्यांनी बुध्दीवादी भुमिका घेतली. स्त्री सुधारणेशिवाय समाजाची प्रगती होणार नाही असा त्यांनी विचार मांडला. पतीचे निधनानंतर केशओपन केले जात होते. ही प्रथा अमंगल, निंध्य, व अन्यय असल्याने त्याने कडाडून विरोध केला. विधवांना हालअपेष्टा करून जीवन जगावे लागत होते. आगरकरांनी 'शहाण्यांचा मुर्खपणा' हा लेख लिहून त्यांनी शक्तीच्या वैध्यव्यावर टिका केली.

समाजात बालविवाहाची पध्दती होती. या पध्दतीमुळे स्त्रीयांची दु:ख स्थिती निर्माण झाली असे आगरकरांचे मत होते. बालविवाह मुळेच संततीवर, समाजावर व स्त्रियांवर वाईट परीणाम होतात. स्त्रीयांना

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0009

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

वैध्यव्य व केसओपन करण्यासारख्या संकटांना सामोरे जाण्याची वेळ येते. स्त्रियांच्या आरोग्याच्या दृष्टीने बालविवाह हानीकारक असतो यासाठी आगरकरांनी बालविवाहास विरोध करून प्रौढ विवाहाचा पुरस्कार केला व संमत्तीवयाच्या बिलास पाठींबा दिला. मध्ययुगात बालविवाह पध्दती सुरू झाली. बालविवाहामुळे सदगुणांचा ऱ्हास होतो. त्यामुळे ही विवाहपध्दती घातक आहे. त्यासाठी सभांचे आयोजन करून त्यांनी प्रबोधन करण्यावर भर दिला. मुलांच्या विवाहचे वय १६-१७ व मुलीचे वय १४ वर्षाच्या खाली असल्यास विवाह करणार नाही अशी शप्पथ पालकांस घेण्यास त्यांनी भाग पाडले. ५० वर्षाच्या पुरूषाबरोबर ११-१२ वर्षाच्या मुलीचा विवाह याला जठर विवाह म्हणतात अशा विवाहाला विरोध करण्याऱ्यासाठी आगरकरांनी 'समज नाही हेच' हा लेख लिहून जठर विवाहावर टीका केली. विवाहाच्या वयाची मर्यादा निश्चित करण्यासाठी त्यांनी कायदा करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. 'आमच्या स्त्रियांचे पेहरराव', 'अलंकार मिमांसा' , 'दागिन्यांचा सोस' असे लेख स्त्रीउद्दारासाठी लिहीले.

**<u>धार्मिक विचार -</u>**

आगरकरांनी सुधारक या वृत्तपत्रातून 'मूर्ती पूजेचा उद्रेक आणि मूर्ती पूजेचे प्रकार' हे दोन लेख प्रसिध्द केले. त्यांना मुर्तीपूजा मान्य नव्हती. हिंदू धर्मात सण उत्सव मोठया प्रमाणात साजरे केले जातात. सुधारक वृत्तपत्रात 'पाच जन्यांचा हंगाम' हा लेख प्रसिध्द करून शिगमा या सणाला विरोध केला. या सणाच्या वेळी उनाड मुले रस्त्यावर उतरून अर्वाच्च शब्द उच्चारतात त्यामुळे सभ्य स्त्रि-पुरूषांना लाजेने मान खाली घालावी लागते. धुळवटीचा दिवस हा या सणाचा अत्यंत वाईट दिवस म्हणून या सणावर कायदयाने बंदी घातली पाहीजे असे प्रतिपादन त्यांनी केले.

हिंदू धर्मामध्ये अनेक देवदेवतांना पशुबळी दिला जात असे. पशुबळींची ही प्रथा आगरकरांना मान्य नव्हती. त्यांनी सुधारक मध्ये 'धर्माचा सुकाळ आणि बकऱ्यांचा काळ' हा लेख प्रसिध्द केला. पशुबळी देण्यास प्रतिबंध असावा असा त्यांनी विचार मांडला. तसेच शनिग्रहासंबंधी ज्या भ्रामक समजुती होत्या त्या कशा खोटया आहेत ते आगरकरांनी समाजाला पटवून दिले. ग्रहाणा संबंधी सुध्दा अनेक गैरसमज प्रचलित होते. 'आमचे अजून ग्रहण सुटले नाहीत' हा लेख लिहून ग्रहणासंबंधिच्या गैरसमजुतीवर आगरकरांनी कडाडून टीका केली. ग्रहण प्रसंगी थंड पाण्याची आंघोळ, दानधर्म, उपवास, मंत्रांचा जप, व सिध्दी केली जात होती. यावर त्यांनी खेद व्यक्त केला. सुधारक वृत्तपत्रांतील अंकात 'प्रेतक्रिया व प्रेतसंस्कार' या शीर्षकाखाली दोन लेख लिहून हिंदू समाजातील प्रेतसंस्कार पध्दती त्रासदायक व संतापजनक असल्याचे स्पष्ट केले. 'सोवळयांची मिमांसा व सोहळया ओवळयाची पुरवणी' हे दोन ग्रंथ लिहून ब्राम्हणांच्या सोवळया ओवळयाच्या गैरसमजुतीवर टिका केली.

**<u>शैक्षणिक कार्य -</u>**

आगरकरांनी नोकरी ऐवजी स्वतंत्र शाळा सुरू करून शिक्षक म्हणून नोकरी स्विकारली यात त्यांचा एक वेगळा ध्येयवाद होता. त्यांनी १८८० मध्ये पूणे येथे विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि लोकमान्य टिळकांच्या सहकार्याने न्यु इग्लिश स्कूलची स्थापना केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे व जे पालक आपल्या मुला-

मुलींना शिक्षण देत नाहीत. त्यांना दंड करावा असे आगरकरांचे मत होते. प्राथमिक शिक्षण सगळयांना देणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यांच्या मते मानसिक व शाररिक क्षिणता, दारिद्रय, पारतंत्र, अंधश्रध्दा, अनिष्ट चालीरिती असलेल्या भारत देशात शिक्षणाशिवाय पर्याय नाही. आगरकरांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. मुला-मुलींना बरोबरीने शिक्षण दिले पाहीजे असे त्यांनी मत मांडले मुला इतकीच मुलींच्या शिक्षणाची सक्ती हा सुधारकमध्ये लेख लिहीला.

**निष्कर्ष -**

विधवा - विवाह, बाल विवाह, विधवांचे केशवपन इत्यादी अनेक विघातक रूढीवर आगरकरांनी सुधारकातून कडाडून हल्ले चढविले. होळीसारख्या सणांचा त्यांनी निषेध केला. खऱ्या समतेचा त्यांनी पुरस्कार केला. कोणत्याही विषयावरील त्यांचा सखोल अभ्यास, समतोल दृष्टीकोन आणि निरपेक्ष बुध्दी त्यांच्या लेखातून जाणवत असे. खऱ्या अर्थाने त्यांनी समाजला वैचारिक नेतृत्व देऊन समाज निरोगी बनविण्याचा प्रयत्न केला. सामाजिक सुधारणा प्रथमत: करण्याचा त्यांनी जरी आपल्या जीवनभर प्रयत्न केला. तरी राजकीय स्वातंत्रयही अतिशय महत्वाचे आहे याची त्यांना पूर्णपणे जाणीव होती. सुधारकातून त्यांनी रॅंडच्या अत्याचारविरूध्द जळजळीत लेख लिहीले.

**संदर्भ -**

1. निला पांढरे : महाराष्ट्रातील सुधारक गोपाळ ग.आगरकर यांचे चरीत्र्, उमेश प्रकाशन
2. अरविंद गणाचारी : गोपाळ गणेश आगरकर, पॉप्युलर प्रकाशन,
3. गो.ग.आगरकर : डोंगरीच्या तुरूंगातील आमचे 101 दिवस
4. वि.स.खांडेकर : गोपाळ ग.आगरकर व्यक्ती आणि विचार
5. माधव दामोदर आळतेकर : गोपाळ ग.आगरकर चरीत्र
6. डॉ. अनिल कठारे : आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास विदयाबुक पब्लिशर्स, औरांगाबाद 2018
7. डॉ. श.गो. कोलारकर : आधुनिक भारताचा इतिहास मंगेश प्रकाशन, नागपूर 1998